Estd: 1962
A++ Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPABX – 2609000**
**FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 Affi.Ext.9089**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग- २६०९०८९)
Website:www.unishivaji.ac.in e-mail:affiliationt1@unishivaji.ac.in

एसयु/संलग्नता/टे-५/एसडीजी/ 2466 दिनांकः 10 JAN 2022
№ 0 0 0 1 2

## सुधारीत परिपत्रक

**प्रति,**

**मा.संस्था अध्यक्ष/प्राचार्य/संचालक**

**सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.**

**विषय:- शारीरिक शिक्षण संचालकांच्या चेंजिस इन स्टाफ मान्यतेबाबत.**
**संदर्भ:- १. जा.क्र. scpeta/२०२०-२१/२४/by hand दि.२०.०१.२०२१**
**२. जा.क्र. scpeta/ २०२०-२१/१२/by hand दि.२२.१०.२०२०**
**३. जा.क्र. एसयु/संलग्नता/टे-५/एसडीजी/२१९५/७०१,दि.०८.११.२०२१**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक यांना यापूर्वी वेगवेगळया स्वरूपाच्या मान्यता दिल्या आहेत. काही शारीरिक शिक्षण संचालकाना मा.उच्च न्यायायलय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.४९६२/२०१२ च्या अनुषंगाने झालेल्या अंतरिम आदेशानुसार शारीरिक शिक्षकांना मान्यता या प्रोबेशन दिल्या आहेत. तसेच एखाद्या शिक्षकांची बदली झालेनंतर त्याची मान्यता ही पर्मनंट मिळत असते. पण एखाद्या संस्थेचे एकच कॉलेज असेल तर त्याला आपण दिलेली प्रोबेशन हीच मान्यता कायम राहते. त्यांच्या चेंजिस इन स्टाफमध्ये बदल होत नाही. अशा स्वरूपाचे पत्र प्राप्त झाले आहे. याबाबत दि.१३.०९.२०२१ व दि.१५.०९.२०२१ रोजी झालेल्या चेंजिस इन स्टाफ समितीसमोर सदरचा विषय ठेवला असता समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरचा विषय दि.२२.१०.२०२१ च्या अधिकार मंडळासमोर ठेवला असता तो मान्य करण्यात आला आहे.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयाच्या अधिन राहून शारीरिक शिक्षण संचालक यांच्या प्रोबेशन ऐवजी पर्मनंट मान्यतेसाठी संस्था/महाविद्यालयाने कायम केलेले पत्र/ठराव तसेच इतर अनुषंगिक कागदपत्र चेंजिस इन स्टाफ फॉर्म व शुल्कासह प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून हे परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व संबधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे. असे यापूर्वी संदर्भ क्र.३ च्या पत्राने कळविण्यात आले आहे.

तथापि दि.२७.१२.२०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार शारीरिक शिक्षण संचालक यांच्या प्रोबेशनच्या ऐवजी पर्मनंट मान्यतेसाठी संस्था/महाविद्यालयाने कायम केलेले पत्र/ठराव सादर करणेची आवश्यकता नाही. याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू
उपकुलसचिव
संलग्नता टी-१ विभाग

D/Changesh in Staff/ Director of Physical Education